CMYK

गणेशोत्सव उत्साहात साजरा करा पण, नियम जाणून घ्या >>पान 2

अभियांत्रिकी, वैद्यकीय व व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी एसईबीसी व ओबीसी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ >>पान 3

मेहकर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा : काँग्रेसचा मुख्यमंत्र्यांकडे आग्रह >>पान 4

**सुविचार**

संयम हा यशाचा मार्ग आहे.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई



हिमेश रेशमियाची मराठी संगीत-सिनेसृष्टीत दमदार एन्ट्री!

आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 36 ■ बुधवार, दि. 27 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# आझाद मैदानात आंदोलन करायचे असेल तर आधी परवानगी घ्या

## हायकोर्टाचे मनोज जरांगेंना निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी : मराठा आरक्षणासाठी निर्णायक लढ्याची घोषणा करून मुंबईकडे कूच करण्याचे आवाहन करणारे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना मुंबई हायकोर्टाने खडसावलं आहे. पूर्वपरवानगीशिवाय आंदोलन करता येत नसल्याचे हायकोर्टाने म्हटले आहे. ऐन गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्यास हायकोर्टाने जरांगे यांना मज्जाव केला. आज हायकोर्टात मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी हायकोर्टाने आपली भूमिका स्पष्ट केली.**



एमी फाउंडेशन यांनी दाखल केलेल्या याचिकेवर आज मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. लोकशाहीत मतभेद मांडण्याचा हक्क असला तरी निदर्शने केवळ नियुक्त केलेल्या ठिकाणीच करता येतात. अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी न घेता निदर्शने करता येणार नाहीत, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्र सरकारला इतर मागासवर्गीय अर्थात ओबीसी गटांतर्गत मराठा समुदायाला १० टक्के कोटा देण्यासाठी मंगळवारपर्यंत अल्टिमेटम दिला. आज संध्याकाळपर्यंत मागणी मान्य न झाल्यास मराठा समर्थकांसह मुंबईला मार्च करतील आणि २९ ऑगस्ट रोजी अनिश्चित काळासाठी उपोषण करतील, असा इशारा दिला होता.

सार्वजनिक मेळावे आणि आंदोलनांसाठी नवीन नियमांनुसार परवानगी मागितल्यानंतर शांततापूर्ण निदर्शने करता येतील, असे उच्च न्यायलयाने स्पष्ट केले. संबंधित अधिकाऱ्यांकडून अशी परवानगी मिळविण्यासाठी प्रतिवादी जारंगे आणि त्यांचे सहकारी अर्ज दाखल करण्यास स्वतंत्र आहेत असेही खंडपीठाने स्पष्ट केले. मात्र, जरांगे यांनी आंदोलनाच्या परवानगीसाठी अर्ज केला तरी त्यानंतर कायद्यातील तरतुदींनुसार सरकारला ते ठरवण्याचा अधिकार असेल, असा निर्वाळा न्यायालयाने दिला.

''मुंबई शहरातील जीवनाचा वेग विस्कळीत होऊ नये म्हणून, शांततापूर्ण निदर्शने करण्यासाठी प्रतिवादीला नवी मुंबईतील खारघर येथे पर्यायी जागा देण्याची परवानगी सरकारला मिळू शकते. सार्वजनिक ठिकाणी अनिश्चित काळासाठी ताबा करता येणार नाही, असेही कोर्टाने स्पष्ट केले. लोकशाही आणि मतभेद एकत्र येतात. परंतु निदर्शने अशा ठिकाणीच करावी लागतात जिथे अशी निदर्शने करता येतील असे खंडपीठाने म्हटले.

बुधवारपासून सुरू होणाऱ्या गणेश चतुर्थी उत्सवादरम्यान पोलिस शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीत व्यस्त असतील. याची कोर्टाने नोंद घेतली.

# सरकारला सांगतो, मी मुंबईत येतोय

## कोर्टाच्या आदेशानंतरही जरांगेंचा एल्गार

**मुंबई/प्रतिनिधी :** खारघरला जर परवानगी देता येते असे जर न्यायदेवतेचे म्हणणे असेल तर आझाद मैदानावर अडचण काय आहे? आम्ही न्यायदेवतेचं सन्मान करणारे लोक आहोत. आम्ही रितसरपणे संविधानाच्या नियमात राहून अर्ज केलेले आहेत. परवानग्या मागितलेल्या आहेत. आमच्या आंदोलनात सरकारने कितीही आडकाठ्या आणण्याचा प्रयत्न केला तरीही आम्ही मागे हटणार नाही. न्यायदेवतेच्या निर्णयावर काही बोलणार नाही पण सरकारला सांगतोय, २७ तारखेला अंतरवाली सराटीहून मी मुंबईच्या दिशेने येतोय, असा निर्धार मनोज जरांगे पाटील यांनी बोलून दाखवला. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही जरांगे मुंबईला येण्यावर ठाम आहेत.

मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन आणि उपोषण करण्याला मुंबई उच्च न्यायालयाने परवानही नाकारली. वकील गुणरत्न सदावर्ते यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवरील सुनावणीदरम्यान, जरांगे यांच्या आंदोलनानाने गणेशोत्सव काळात मुंबईतील रहदारीला बाधा येईल तसेच वाहतूक कोंडी, शहरातील गर्दीने अनेक प्रश्न उभे राहतील, असे सांगून मुंबई उच्च न्यायालयाने जरांगे यांच्या आंदोलनाला परवानगी नाकारली. जरांगे यांना खारघर, नवी मुंबईत आंदोलन करता येईल, तिथे परवानगी देता येईल, असेही न्यायालयाने सुचवले. न्यायालयाच्या निर्णयावर मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली.




मनोज जरांगे पाटील म्हणाले, गरीब लोकांच्या वेदना आहेत. कायदा हा जनतेसाठी आहे. त्या जनतेचे गाऱ्हाणे ऐकून घेणे हे सरकारचे काम आहे, न्यायदेवतेचे काम आहे. आमचीही वकिलांची टीम कार्यरत आहेत. न्यायदेवतेसमोर आमचीही बाजू आम्ही मांडणार आहोत. न्यायदेवता शंभर टक्के आम्हाला न्याय देईल. लोकशाही पद्धतीने होणारे आंदोलन रोखता येत नाही. असे जर सरकार करीत असेल तर इंग्रजांच्या काळातही आंदोलने, उपोषणे झाली आहेत. आता तर इंग्रजांची सत्ता नाही. सत्ताधाऱ्यांनी गोरगरिबांच्या भावनेशी खेळायला नको. मराठ्यांचा संयम देवेंद्र फडणवीस यांनी पाहू नये. आम्हाला परवानगी मिळू नये यासाठी फडणवीस सरकार प्रयत्न करते आहे, अशी सडकून टीका जरांगे पाटलांनी केली.

## याची ७५ वर्ष पार केलेल्या आजोबांनी दिली चलो मुंबईची हाक



**बीड/प्रतिनिधी:** बीड जिल्ह्यातील गाव खेड्यातून आता मराठा बांधव एकवटला आहे. मुंबईच्या दिशेने रवाना होण्यासाठी पूर्ण तयारी करत असतानाच, आता बीडच्या लिंबागणेश येथील वयाची ७५ वर्ष पार केलेल्या आजोबांनी देखील चलो मुंबईची हाक दिली आहे. आमचे आयुष्य गेलं, मात्र आरक्षण मिळालं नाही. आता आम्ही मुंबईला जाणार, अशी प्रतिक्रिया त्या आजोबांनी दिली आहे. त्याचबरोबर मराठा समाजाला शिक्षण व नोकरीत आरक्षण मिळावे म्हणून मागील ४० वर्षांचा संघर्ष अखेर फलदायी ठरत असून, आतापर्यंत ५८ लाख कुणबी नोंदी मिळाल्याने समाजाला मोठा फायदा झाला आहे. भविष्यात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे कायमस्वरूपी आरक्षण मिळेल, या ठाम विश्वासाने मराठा समाज एकदिलाने मुंबई आंदोलनात सहभागी होणार असल्याचे देखील मराठा बांधवांनी सांगितले.

## पुण्यात मतचोरीच्या मुद्द्यावरून विद्यार्थी काँग्रेस सेनेचे रास्ता रोको आंदोलन



**पुणे/प्रतिनिधी:** मतचोरीच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षातील अनेक जण गेल्या अनेक दिवसांपासून आपली मत मांडताना दिसत आहे. आणि याच मत चोरीच्या मुद्द्यावरून आज पुण्यामध्ये काँग्रेस विद्यार्थी सेना म्हणजेच एनएसयुआय आक्रमक झालेली आपल्याला पाहायला मिळाले. या आंदोलनामार्फत युवक काँग्रेसच्या विद्यार्थ्यांकडून निवडणूक आयोगाच्या विरोधात तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विरोधात घोषणाबाजीकरण्यातआली.

# भारतातील १५ अधिकारी पाकिस्तानी गुप्तहेरांच्या संपर्कात

## गुप्तचर माहिती पाकिस्तानला पाठवली; तपासात खळबळजनक खुलासा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय तपास यंत्रणांच्या सूत्रांनी एक खळबळजनक खुलासा केला आहे कि, असे १५ फोन नंबर सापडले आहेत, जे पाकिस्तानी हेरांच्या संपर्कात होते. हे नंबर लष्करातील सैनिक, निमलष्करी दलातील जवान आणि सरकारी खात्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांशी संबंधित असल्याचा धक्कादायक दावा करण्यात आला आहे. सीआरपीएफचे सहाय्यक उपनिरीक्षक मोती राम जाट यांच्या तपासात हि माहिती उघड झाली आहे. द इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, सीआरपीएफचे सहाय्यक उपनिरीक्षक मोती राम जाट यांनाही तीन महिन्यांपूर्वी या पाकिस्तानी गुप्तहेरासोबत भारताशी संबंधित माहिती शेअर केल्याबद्दल अटक करण्यात आली होती. या प्रकरणाच्या तपासादरम्यान तपास यंत्रणांनी हा खुलासा केला आहे.

राष्ट्रीय तपास यंत्रणेने २७ मे रोजी मोती राम जाट यांना अटक केली होती. तर २२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पाच दिवस आधीपर्यंत मोती राम जाट सीआरपीएफ बटालियनमध्ये तैनात होते, परंतु हल्ल्याच्या फक्त पाच दिवस आधी ते दिल्लीत तैनात होते.

तांत्रिक तापसात असे दिसून आले की केवळ मोती राम जाटच नाही तर इतर १५ फोन नंबर देखील पाकिस्तानी गुप्तहेराच्या संपर्कात होते. अधिकारी या नंबरच्या कॉल रेकॉर्ड आणि डेटाची तपासणी करत आहेत. या पाकिस्तानी ऑपरेटिव्हचे कोडनेम सलीम अहमद आहे. सूत्रांनी सांगितले की, या १५ फोन नंबरचे कॉल रेकॉर्ड आणि इंटरनेट प्रोटोकॉल डिटेल रेकॉर्ड स्कॅन केले असता असे आढळून आले की, यापैकी ४ नंबर भारतीय लष्करी कर्मचाऱ्यांचे, ४ पॅरामिलिटरी फोर्सच्या कर्मचाऱ्यांचे आणि उर्वरित सात नंबर विविध सरकारी विभागात काम करणाऱ्या लोकांचे होते.



सूत्रांनी सांगितले की, तपासात असेही उघड झाले आहे की, ज्या नंबरद्वारे मोती राम जाट संपर्कात होता तो नंबर कोलकाता येथून खरेदी करण्यात आला होता आणि सिम सक्रिय करण्यासाठीचा ओटीपी देखील लाहोरमध्ये बसलेल्या पाकिस्तानी ऑपरेटिव्हला पाठवण्यात आला होता. कोलकाता येथून हा नंबर खरेदी करणारा व्यक्ती कोलकाता येथील आहे, ज्याने २००७ मध्ये एका पाकिस्तानी महिलेशी लग्न केले आणि नंतर २०१४ मध्ये तिथे स्थलांतरित झाला. तो वर्षातून दोनदा कोलकाता येथे येत असे. सूत्रांनी असेही सांगितले की, मोती राम जाटला माहिती शेअर करण्याच्या बदल्यात भारतातील वेगवेगळ्या शहरांमधून अनेक वेळा पैसे पाठवले जात होते. दोन वर्षांत, गुप्तचर माहिती पाठवण्याच्या बदल्यात त्याला नियमितपणे १२,००० रुपये देण्यात आले, जे महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, राजस्थान, आसाम, दिल्ली, हरियाणा आणि पश्र्चिम बंगालमधून त्याच्या बँक खात्यात हस्तांतरित केले गेले. मोती राम जाटचा दावा आहे की, तो प्रथम चंदीगडच्या एका टीव्ही चॅनेलमध्ये काम करणाऱ्या पत्रकाराच्या संपर्कात आला आणि नंतर त्याच्याशी फोन आणि व्हिडिओ कॉलवर बोलू लागला. या काळात त्याने अनेक कागदपत्रे देखील शेअर केली. तो म्हणाला की नंतर तो एका पाकिस्तानी अधिकाऱ्याशी बोलू लागला आणि हे सर्व चालू राहिले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोती राम जाटने सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या तैनातीशी संबंधित माहिती, अनेक एजन्सींच्या केंद्रांशी संबंधित माहिती, सैनिकांच्या हालचालींशी संबंधित माहिती पाकिस्तानी हँडलरसोबत शेअर केली.

## प्रस्तावित जंक्शन एमआयडीसीसाठी आवश्यक जागेचा प्रस्ताव उद्योग विभागाने सादर करावा : बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात प्रस्तावित जंक्शन एमआयडीसी साठी लागणाऱ्या अतिरिक्त जागा मागणीचा प्रस्ताव उद्योग विभागाने महसूल विभागाकडे सादर करावा, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. महसूल विभागाने प्रस्तावित जंक्शन एम आयडीसीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी, असे कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. मंत्रालयात प्रस्तावित जंक्शन एम आयडीसीसाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील जमिनीसंदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री योगेश कदम, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक मंजिरी मनोलकर, व्ही.सी.द्वारे पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे उपमु'य कार्यकारी अधिकारी संतोष भिसे यासह इतर अधिकारी उपस्थित होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, पूर्वी झालेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर परिसर येथे नवीन औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता मौजे



जंक्शन, मौजे भरणेवाडी, मौजे अंथुर्णे, मौजे लासुर्णे येथील जमिनीसहित इतर अतिरिक्त लागणाऱ्या जमिनीबाबतचा सविस्तर प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योग विभागामार्फत महसूल विभागाकडे सादर करावा. हा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात येईल असेही महसूल मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. कृषि मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर परिसर येथे प्रस्तावित जंक्शन एमआयडीसी स्थापन करण्यात येणार आहे. सध्या असलेल्या जमिनीसहित एमआयडीसीसाठी अतिरिक्त जमिनीची आवश्यकता आहे. मौजे जंक्शन,मौजे भरणेवाडी,मौजे अंथुर्णे,मौजे लासुर्णे येथील जमिनीसहित या क्षेत्रालगत असलेल्या शेती महामंडळाचे सलग १००० एकर क्षेत्र नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात यावे.

# वराह जयंतीवरून रविकांत तुपकर यांचा नितेश राणेंना जोरदार टोला

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाण्यात वराह जयंतीच्या पार्श्वभूमीवर राजकीय तापमान वाढले असून, शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी थेट राज्यमंत्री नितेश राणे यांच्यावर निशाणा साधला आहे. तुपकर यांनी आपल्या नेहमीच्या ठसक्याच्या आणि उपरोधिक शैलीत नितेश राणेंना टोला लगावत म्हटलं की, ''आमच्या शेतात आणि गावात जी डुकरं आहेत, ती नितेश राणेंनी आपल्या बंगल्यावर नेऊन रोज त्यांची पूजा करावी.'' असं केल्याने ''किमान आमच्या शेतीतील पिकांचं नुकसान तरी टळेल,'' अशी तिखट प्रतिक्रिया तुपकर यांनी दिली आहे.

**पार्श्वभूमी काय?**

वराह जयंती ही हिंदू धर्मातील एक साजरी केली जाणारी विशेष तिथी असून, भगवान विष्णूंच्या वराह अवताराशी संबंधित आहे. मात्र, काही राजकीय नेते आणि गट या धार्मिक सणाचा उपयोग समाजात विभाजन करणाऱ्या भाषणांसाठी करत असल्याचा आरोप तुपकरांनी केला आहे. त्यांच्या मते, शेतकऱ्यांच्या खरी समस्यांकडे लक्ष न देता दिशाभूल करणारी विधाने केली जात आहेत.





**रविकांत तुपकर म्हणाले**

''सध्या नितेश राणेंना वराह जयंतीसाठी खूप प्रेम आलं आहे. आमचं मात्र डुक्करांचं नुकसान होतंय. आमच्या शेतात जे डुकरं उधळून पिकांचं नुकसान करतायत, ती त्यांनी त्यांच्या बंगल्यावर नेऊन रोज पूजा करावी. त्यामुळे आमचं शेतीचं तरी वाचेल. या लोकांनी शेतकऱ्यांच्या व्यथा सोडून सणवारात राजकारण आणलंय.''

**राजकीय प्रतिक्रिया**

तुपकरांच्या या टीकेनंतर राज्यात पुन्हा एकदा शेतकरी प्रश्नांवर लक्ष केंद्रित होण्याची शक्यता आहे. नितेश राणे यांच्याकडून यावर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, त्यांच्या भूतकाळातील वक्तव्य पाहता, त्यांच्याकडूनही तडाखेबाज उत्तर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शेतकऱ्यांचा मुद्दा केंद्रस्थानी**

रविकांत तुपकर यांनी या वक्तव्याद्वारे फक्त नितेश राणे यांच्यावर नव्हे, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेवरच कटाक्ष टाकत, शेतकऱ्यांच्या समस्या, विशेषत: डुकरांमुळे होणारे शेतीचं नुकसान याकडे सरकारचं लक्ष वेधलं आहे.

CMYK

## अजरामर पार्श्वगायक मुकेश

आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपट सृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा आज स्मृतिदिन. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. ''मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. स्मृतिदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

# गणेशोत्सव उत्साहात साजरा करा पण, नियम जाणून घ्या

## काय करावे आणि काय करू नये? लेखी परवानगी आवश्यक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** दरवर्षी प्रमाणे यावर्षी दि. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव साजरा होत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शहरात, गावात, खेड्यात सार्वजनिक रस्त्यावर अगर रस्त्याच्या आसपास सार्वजनिक शांतता भंग न होण्याच्या हेतुने गणेशोत्सवानिमित्त होणारे मेळावे, दिंडी अगर मिरवणूकीत भाग घेणाऱ्या लोकांचे नियमनाकरीता मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम ३३,३७ व ४० प्रमाणे निर्बंध घालण्यात आले आहेत, याबाबतचा जाहीरनामा जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी जारी केला आहे.



जिल्ह्यात दि. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत (दोन्ही दिवस धरुन) कोणासही श्री गणपती स्थापने प्रित्यर्थ अगर विर्सजना प्रित्पर्य मेळावे किंवा पालख्या किंवा वाद्यांसहीत मिरवणूक काढावयाची झाल्यास, अगर नाचगाणे किंवा कुस्त्यांचे सामने करावयाचे असल्यास त्या व्यक्तीने संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याकडुन लेखी परवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. अशी लेखी परवानगी घेतल्याशिवाय गणेशोत्सव कालावधीत कोणत्याही प्रकारची मिरवणूक काढण्यास मनाई आहे. प्रेत यात्रेला मात्र नियम लागू राहणार नाही.

**परवानगीसाठी अर्ज कसा व कुठे करायचा :**

ज्यांना परवाने पाहिजे असतील त्यांनी अशी मिरवणूक काढावयाच्या अगोदर लेखी अर्जाद्वारे संबंधित पोलीस ठाण्याच्या ठाणेदार यांच्याकडे विहित नमुन्यात माहिती भरुन देणे आवश्यक आहे. या लेखी अर्जात मुख्य आयोजकाचे पूर्ण नाव व पत्ता, ज्या कारणासाठी परवाना पाहिजे ते कारण, मेळावा अगर मिरवणूकीचे वर्णन व मंडळाचे नांव, कोणकोणत्या ठिकाणी जाण्याकरीता परवाना पाहिजे तो तारीख व वेळ, ज्या रस्त्याने मिरवणूक अगर मेळावा जाणार असेल तो रस्ता, ज्या तारखेचा किंवा वेळेचा परवाना पाहिजे ती तारोख व वेळ, मिरवणूक चालकाचे व सदस्यांचे पूर्ण नाव व पत्ता, मुख्य आयोजकाने मिरवणूकीतील किंवा मेळाव्यातील प्रत्येक व्यक्तीचे योग्य शांत वर्तनाबद्दल तो स्वतः जबाबदार आहे असे अर्जावर लिहून दिले पाहीजे. मिरवणूकीत वापरावयाचे वाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी बुलढाणा यांचेकडून तपासून घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल. अशा प्रकारची मिरवणूक अगर मेळावा सार्वजनिक जागेतून नेतांना संबंधित व्यक्तीजवळ असा परवाना असावयास पाहिजे व दंडाधिकारी अगर पोलीस अंमलदार यांनी तो पहावयास मागीतल्यास त्यांना दाखवणे बंधनकारक राहणार आहे.

**काय करावे :**

श्री गणपती विर्सजनाचे दिवशी मिरवणुक अगर मेळावा रात्री १० वाजेपर्यंत मिळालेल्या परवान्यात नमुद केलेल्या रस्त्यानेच व वेळेनुसार काढण्यात यावी. दुसऱ्या रस्त्याने त्यांना जावू दिले जाणार नाही व वहीवाट अगर इतर सबब ऐकली जाणार नाही. त्या मिरवणुकीमुळे इतर मिरवणूकीस अगर रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. अडथळा झाला तर त्याबद्दल तो मुख्य आयोजक जबाबदार धरला जाईल. मिरवणूक विर्सजन वेळेच्या आत केले पाहीजे. कोणत्याही प्रसंगी मिरवणूक अथवा मेळावा ह्यांनी प्रेतयात्रेला वाट दिली पाहीजे.

**काय करु नये :**

व्यक्ती, प्रेत अगर त्यांच्या प्रतीमा यांचे सार्वजनिक जागेत प्रदर्शन करण्यास मनाई आहे. गणेशोत्सवाच्या काळात सभ्यता अगर नितिमत्तेत बिघाड होईल किंवा कायद्याविषयी तिरस्कार निर्माण होईल किंवा निरनिराळ्या जमातीतील शांतता धोक्यात येईल असे कोणतेही कृत्य किंवा गैरवर्तन करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जातीय तंटे, बखेडे निर्माण होतील अगर निरनिराळ्या भागात किंवा जमातीत संघर्ष निर्माण होईल असे कोणतेही कृत्य भाषण, जाहीरात प्रदर्शन, अंगविक्षेप, सोंग काढणे यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच विभत्स शब्दांचा उच्चार करु नये किंवा विभत्स सोंग आणू नयेत. कोणास अपमानकारक चिड येण्यासारखे किंवा असे कोणतेही कृत्य करु नये व शांततेचा भंग होईल अशा प्रकारच्या घोषणा करु नये, अगर गैरशिस्त गोंगाट करु नये. ज्याचे बरोबर वाद्य साहित्य, खेळ, दिंड्या, आखाडे, सोंग फलके आहेत अशा लोकांनी रस्त्याने जातांना आजूबाजूस राहणाऱ्या लोकांना त्रास होईल अशा रितीने थांबू नये, अगर गाणे गावू नये आणि ज्यावेळी एखादे जनावर बुजाडण्याचा संभव असेल त्या त्या वेळी अशी जनावरे तेथून निघून जाईपर्यंत वाद्य वाजविणे एकदम बंद ठेवले पाहीजे.

**मेळावे किंवा मिरवणुकीत घ्यावयाची काळजी :**

मशीद जवळून मिरवणूक जातांना मशीदीपुढे न थांबता पुढे निघून जावे, रंगाळू नये. मेळावे किंवा मिरवणुक रस्त्याने जात असता किंवा रस्त्याने मेळाव्यातील मुले पदे म्हणू लागली असता अगर रस्त्याने काही वेळ पर्यंत मेळाव्यास उभे राहणे भाग पडले असता मेळाव्याचे अगर मिरवणूकीच्या मुख्य आयोजकाने रस्त्यावरुन गाडी वगैरे वाहनास अडवळा होणार नाही अशी तजविज केली पाहीजे असा अडथळा झाला तर त्या बद्दल तो मुख्य आयोजक जवाबदार धरला जाईल. मेळावा अगर मिरवणूक रस्त्याने जात असतांना त्यातील कोणत्याही इसमाने विशेष परवाण्याशिवाय कोणतेही अग्नीशख, मशाल (टेंभे), तलवार, खंजीर, कट्यार चाकू, काठ्या, वांबू, छोटे दगड, गोफन अगर कोणत्याही प्रकारचे शस्त्र अगर ज्या योगे दुखापत करता येईल असे कोणतेही शस्त्र किंवा पदार्थ घेवून जावू नये अथवा जवळ बाळगू नये ज्यांचे जवळ असे शस्त्र किंवा वस्तू सापडतील त्यांचे जवळून ते घेवून पोलीसांच्या ताब्यात देण्यात येतील. हा जाहिरनामा अंमलात आला असून संबंधितांनी पाळावा. या जाहिरनाम्यातील कोणत्याही शर्तीच्या विरुध्द गुन्हा करणाऱ्यांवर मुंबई पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५, १५२ आणि भारतीय नागरिक न्याय संहीता २०२३ प्रमाणे सुध्दा खटला भरण्यात येईल, असा इशारा देखील देण्यात आला आहे.

### गणेशोत्सव शांततेत आणि सामंजस्याने साजरा करा - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

''गणेशोत्सव हा आनंदाचा आणि श्रद्धेचा सण आहे. यंदाच्या गणेशोत्सवाला ''राज्य महोत्सव'' हा दर्जा देण्यात आला आहे. हा महोत्सव शांततेत आणि सामंजस्याने साजरा करावा. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे,'' असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# गणेशोत्सवासाठी ठाणे पोलीस सज्ज

दैनिक आपला विदर्भ



**ठाणे/प्रतिनिधी:** २७ सप्टेंबर पासून गणेशोत्सवाला प्रारंभ होत आहे. या गणेशोत्सवानिमित्त उद्या घरोघरी लाडक्या गणरायाचे आगमन मोठ्या जल्लोषात व थाटामाटात करण्यात येणार आहे. तर गुरुवारी दीड दिवसांच्या गणपती बाप्पांचा विसर्जन सोहळा पार पडणार आहे. या काळात शहरात कोणत्याही अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा सुव्यवस्था अबाधित रहावा व सण उत्सव नागरिकांना आनंदात साजरी करता यावे, या अनुषंगाने ठाणे पोलीस सज्ज झाले आहेत.

आज नौपाडा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या चंदनवाडी शहीद गार्डन येथे पोलिसांचा लाँग मार्च काढण्यात आला होता. त्यामध्ये नौपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन स पोलीस स्टेशन मधील सर्व पोलीस कर्मचारी अधिकारी वर्ग सहभागी झाला होता. तसेच त्या गणेशोत्सवा काळात विसर्जनाच्या दिवशी व आगमनाच्या दिवशी कमी आवाजात लावावा. तसेच या वर अश्लील गाणे लावू नये, व हा गणेशोत्सव आनंदात साजरा करावा. या सणाला कोणतेही प्रकारचे गालबोट लागता कामा नये, याची खबरदारी गणेशोत्सव मंडळातील गणेश भक्तांनी घ्यावी. असे आवाहन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन यांनी केले.

## पाऊस पडला तरी नळात पाणी येत नाही; ढाणकी शहरात नळ सजावटीचा विषय बनले आहेत

**उमरखेड/प्रतिनिधी:** पावसाळा असूनही, पंधरा दिवसांनीही नळाला पाणी येत नाही ही गोष्ट नगर पंचायतीच्या पाणीपुरवठा व्यवस्थेतील बिघाड म्हणून मानावी का? आज ढाणकीजवळील नाले, नद्या आणि विहिरी पूर्ण क्षमतेने भरलेल्या असूनही, नगर पंचायतीची पाणी साठवण क्षमता अपुरी असल्याने आणि योग्य पाणी नियोजनाचा अभाव असल्याने गावात पंधरा दिवसांनीही नळाला पाणी येत नाही याची जबाबदारी कोणाची?

लाखो रुपये खर्च करून नगर पंचायत पाणीपुरवठा विभागामार्फत गांजेगाव पैनगंगा नदीतून नळाच्या पाणीपुरवठ्यासाठी पाईपलाईन टाकण्याचे काम सुमारे सहा महिन्यांपासून सुरू आहे, परंतु ते आजपर्यंत पूर्ण झालेले नाही. या कामात ढाणकी नगर पंचायत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा नियोजनाचा अभाव आणि देखरेखीकडे दुर्लक्ष केल्यामुळे, ढाणकी येथील महिलांना पावसाळ्यातही पाण्यासाठी भटकंती करावी लागते. हे दुर्दैवी मानावे लागेल.

**ढाणकी शहरातील प्रभाग १२ मध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून नळाला पाणीपुरवठा होत नाही. पावसाच्या पाण्यामुळे गावातील नाले तुडुंब भरून वाहत आहेत, पण नळाला पाणीपुरवठा होत नाही? मंग नगर पंचायत काय करत आहे? ढाणकीची पाणी समस्या सोडवण्यासाठी कोणी वाली आहे का?**

**–तुळशीराम वाघाडे**
**प्रभाग १२ चे रहिवासी**

# हिमेश रेशमियाची मराठी संगीत–सिनेसृष्टीत दमदार एन्ट्री!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या गाजलेल्या संगीतामुळे प्रचंड लोकप्रिय झालेल्या हिमेश रेशमिया यांना मराठी प्रेक्षक आता एका वेगळ्या भूमिकेत पाहणार आहेत. आतापर्यंत त्यांनी दिलेली हिट गाणी, टीव्हीवरील उपस्थिती आणि परफॉर्मन्सेसमुळे त्यांची स्वतःची एक खास ओळख तयार झाली आहे. पहिल्यांदाच मराठी चित्रपटासाठी म्युझिक प्रेझेंटर म्हणून काम करताना ते अतिशय उत्सुक असून, मराठी प्रेक्षकांकडूनही त्यांना तितकाच छान प्रतिसाद मिळेल, अशी त्यांची खात्री आहे. हिमेश रेशमिया मेलोडीज लेबलच्या माध्यमातून त्यांनी 'नाच मोरा...' हे गाणे सादर केले असून, हे त्यांच्या मराठी संगीत प्रवासाची दमदार सुरुवात ठरणार आहे.

हिमेश रेशमियानं केलं मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण : हिमेश रेशमियानं सोशल मीडियावर या गाण्याबद्दल भावना व्यक्त करताना लिहिलं आहे की, ''मी एक भन्नाट गाणं घेऊन आलोय... तयार आहात ना? माझ्या पहिल्याच मराठी चित्रपटाच्या या गाण्याला तुम्ही मनापासून प्रेम द्याल, याची खात्री आहे.'' श्रेय पिक्चर कंपनी निर्मित आणि नम्रता सिन्हा प्रस्तुत 'सकाळ तर होऊ द्या' या बहुचर्चित चित्रपटातील पहिलं गाणं नुकतेच प्रदर्शित झाले. या चित्रपटाद्वारे हिंदी मालिकांतून आणि वेबसीरिजमधून मोठा अनुभव घेतलेली नम्रता सिन्हा मराठीत पदार्पण करत आहेत. दिग्दर्शक आलोक जैन यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले असून, तेही मराठीत पहिल्यांदाच वेगळा प्रयोग करत आहेत. या गाण्याद्वारे अभिनेता सुबोध भावेचा एक हटके लुक प्रेक्षकांसमोर आला आहे. लांब केस, दाढी आणि कॅज्युअल पेहरावात तो या गाण्यात दिसत असून, त्याचे असे रूप प्रेक्षकांना आतापर्यंत पाहायला मिळाले नव्हते. सुबोधसोबत मानसी नाईक गुलाबी साडीतील नृत्यानं खुलली आहे. या जोडीची झलक गाण्यात पाहायला मिळते आणि त्यांची केमिस्ट्री चाहत्यांना आकर्षित करते. मध्यप्रदेशातील रम्य लोकेशनवर चित्रित करण्यात आलेले हे गाणे फिरोझ खान (बॉली–ब्रदर्स) यांनी नृत्यदिग्दर्शित केले आहे.

''नाच मोरा...'' या गाण्याबद्दल : ''नाच मोरा...'' हे गाणे अभिषेक खणकर यांच्या ओळींवर रोहित राऊतच्या संगीतात साकारले असून, ज्युईली जोगळेकरच्या आवाजामुळं त्याला वेगळाच गोडवा प्राप्त झाला आहे. या गाण्यामुळे तरुणाईसोबतच सर्व वयोगटातील रसिक नक्कीच ताल धरतील, अशी निर्मात्यांची अपेक्षा आहे. 'सकाळ तर होऊ द्या'चे संवाद ओंकार बर्वे आणि अंकुश मरोडे यांनी लिहिले असून, छायाचित्रण सुनील पटेल यांनी केले आहे. सिनेपोलीस या चित्रपटाचे वितरण करणार असून, हा चित्रपट १० ऑक्टोबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### गणपती तयार करणारा मूर्तीकार प्रफूल्ल तांबडे यांच्या विरोधात गुन्हा

दैनिक आपला विदर्भ

**डोंबिवली/प्रतिनिधी:** डोंबिवलीतील विष्णूनगर पोलिस ठाण्यात गणपती तयार करणारा मूर्तीकार प्रफूल्ल तांबडे याच्या विरोधात गुन्हा भारतीय न्याय संहिता ३१८ (४) २१६ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणपती तयार करणारा मूर्तीकार प्रफूल्ल तांबडे याने पैसे घेऊन मूर्तीकाराने मूर्ती वेळेवर तयार केल्या नाहीत. भक्तांची फसवणूक केली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डोंबिवली पश्चिम येथील किनार मैदानावर असलेल्या आनंदी कला केंद्रात हा प्रकार घडला आहे. विष्णूनगर पोलिस प्रफूल्ल तांबडे याच्या शोधात असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

### न्याय आपल्याला मिळालाच पाहिजे, ही भूमिका आहे - छत्रपती शाहू महाराज

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड /प्रतिनिधी:** जरांगे पाटलांच्या आंदोलनाला परवानगी नाकारली. शेवटी तिथे जाऊन पोहोचतील आणि शासनाला त्यांचं मत काय आहे ते सांगतील. मला वाटतं शेवटी शासन त्यांना भेटेल.आंदोलनावर आंदोलन आपलं चालू आहे, न्याय आपल्याला मिळालाच पाहिजे, ही भूमिका आहे. अशी प्रतिक्रिया खासदार छत्रपती शाहू महाराज यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

खासदार छत्रपती शाहू महाराज यावेळी म्हणाले की, मनोज रंगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी लढा देत आहेत.आता त्यांनी मुंबईकडे जाण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, सरकारने जरंगे पाटलाच्या आंदोलनाला परवानगी नाकारली आहे. मराठा आरक्षणासाठी आंदोलनावर आंदोलने चालू आहेत. आपल्याला न्याय मिळाला पाहिजे ही भूमिका आहे. अशी प्रतिक्रिया खासदार छत्रपती शाहू महाराज यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### गणेशोत्सव व ईद ए मिलाद एकाच दिवशी आल्यामुळे मुस्लिम बांधव ईदचा जुलूस ८ ऑक्टोबला काढणार



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी:** मागील कित्येक वर्षांपासून गणेशोत्सव व ईद ए मिलाद हे दोन्ही सण एकाच दिवशी येतं असतात आणि यामुळे मुस्लिम बांधवानी मनाचा मोठेपणा दाखवत ईचा जुलूस पुढे ढकलत असतात. त्यामुळे यावर्षी ही आम्ही नवी मुंबईतील सर्व मुस्लिम बांधवांनी गरीब नवाज मस्जिद मध्ये एकत्र येऊन सर्वानुमते पुढील महिन्याच्या ८ तारखेला नवी मुंबई ईद ए मिलाद जुलूस कमिटी बनली आहे. दिघा ते बेलापूर मधील सर्व संघटना आपल्या परीने जुलूस काढतात आणि शेवटी घणसोली येथील दर्गा जवळ संपतात. त्यामुळे यावर्षी ही अश्याच प्रकारे ईद ए मिलाद सण साजरा होईल.

### गणपती तयार करणारा मूर्तीकार प्रफूल्ल तांबडे याच्या विरोधात गुन्हा

दैनिक आपला विदर्भ

**डोंबिवली/प्रतिनिधी:** डोंबिवलीतील विष्णूनगर पोलिस ठाण्यात गणपती तयार करणारा मूर्तीकार प्रफूल्ल तांबडे याच्या विरोधात गुन्हा भारतीय न्याय संहिता ३१८ (४) २१६ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणपती तयार करणारा मूर्तीकार प्रफूल्ल तांबडे याने पैसे घेऊन मूर्तीकाराने मूर्ती वेळेवर तयार केल्या नाहीत. भक्तांची फसवणूक केली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डोंबिवली पश्चिम येथील किनार मैदानावर असलेल्या आनंदी कला केंद्रात हा प्रकार घडला आहे. विष्णूनगर पोलिस प्रफूल्ल तांबडे याच्या शोधात असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.



अभियांत्रिकी, वैद्यकीय व व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी एसईबीसी व ओबीसी विद्यार्थ्यांना

# जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचा एसईबीसी आणि ओबीसी विद्यार्थ्यांना दिलासा**

**मुंबई/प्रतिनिधी:** सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विविध शैक्षणिक संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या परंतु जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यात अडचणी येत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहणार आहे .मुदतवाढ दिलेल्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र न दिल्यास अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील आणि त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावरच राहील.

राज्यात दि.२६.फेब्रुवारी २०२४ पासून एसईबीसी आरक्षण अधिनियम, २०२४ लागू करण्यात आला असून त्यानुसार एसईबीसी प्रवर्गास शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता १० टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. मा.न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना नव्याने कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग प्रवर्गाचे (ओबीसी) जात प्रमाणपत्र प्राप्त झाले आहेत. हे एसईबीसी आरक्षणनुसार कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग प्रवर्गाचे (ओबीसी) जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू असल्यामुळे सदर प्रवर्गातील काही विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र अलीकडच्या काळात मिळालेली असल्याने त्यांना अद्याप जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेली नाहीत. या विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे प्रवेश जात वैधता प्रमाणपत्रांच्या अभावी अवैध होऊ नयेत, म्हणून सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाकरीता सहा महिने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.



याबाबतचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करून देण्यात आला आहे. असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

## कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत इस्त्राईल येथे घरगुती सहाय्यक पदासाठी रोजगाराची संधी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत जिल्ह्यातील पुरुष व स्त्री उमेदवारांना, इस्त्राईल येथे घरगुती सहायक या कामासाठी रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बुलडाणा चे सहायक आयुक्त श्री ग. प्र. बिटोडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या २५ ते ४५ वयोगटाचे उमेदवार या संधीचा लान घेण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे ''घरगुती सहायक'' सेवांसाठी निपुण/पारंगत, भारतीय सक्षम प्राधिकरणाव्दारे प्रदान केलेल्या मिडवायफरीमधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए/एएनएम जीएनएम / बीएससी नर्सिंग/पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. नोकरीचे वर्णन व तपशील पुढीलप्रमाणेः घरगुती सहायक पदाचे नाव असून त्यास किमान पात्रता १० वी उत्तीर्ण, अनुभव, डिप्लोमा आणि प्रमाणपत्र काळजीवाहक सेवा प्रदान करण्यासाठी पात्र आणि भारतातील सक्षम नियामक प्राधिकरणाकडून जारी केलेले प्रमाणपत्रधारक असावा. नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स सहाय्यक, किंवा प्रसूतीशास्त्र प्रशिक्षण पूर्ण केलेला, ज्याच्याकडे संबंधित भारतीय प्राधिकरणांकडून डिप्लोमा मान्यताप्राप्त आहे.

GDA/ANM/GNM/BSC Nursing / Post BSc Nursing इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक वयोमर्यादा २५ ते ४५ वर्षे. पुरुष/स्त्री उमेदवार पात्र. उंची/बजन किमान ५ फूट / ४५ किलो किंवा अधिक. पासपोर्ट वैधता किमान ३ वर्षे. इतर आवश्यकता उमेदवाराने पूर्वी इस्त्राईलमध्ये काम केलेले नसावे. त्याचा / तिचा जोडीदार, पालक किंवा मुले इस्त्राईलमध्ये सध्या काम करत असू नयेत किंवा इस्त्राईल रहिवासी नसावा. इजराइल येथे नोकरी इच्छुक उमेदवारांनी www.maharashtrainternational.com या संकेतस्थळावर नोंदणी करून परदेशातील रोजगार संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, तळमजला, बुलढाणा येथे कार्यालयीन वेळेत अथवा कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२३४२ संपर्क साधावा. असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र चे सहायक आयुक्त श्री ग. प्र. बिटोडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या लघु उद्योग व्यवसाय व शिक्षण कर्ज पुरवठा योजनांचा लाभ घ्या !

**इच्छूकांनी अर्ज करण्याचे आवाहन**
**१ ते ५० लाखांपर्यंत कर्ज मिळणार**

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., जिल्हा कार्यालय बुलढाणा अंतर्गत मुख्य कंपनी व १३ उपकंपन्यांमार्फत लघुउद्योग व्यवसाय तसेच शिक्षणाकरिता कर्ज पुरवठा करण्यात येतो. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता महामंडळाच्या विविध योजनांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून पात्र इच्छूकांनी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस. एम. राठोड यांनी केले आहे.



महामंडळाच्या प्रमुख योजना :- थेट कर्ज योजना मर्यादा रु. १.०० लाख, २० टक्के बीज भांडवल योजना मर्यादा रु. ५.०० लाख, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना मर्यादा रु. १५.०० लाख, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना मर्यादा रु. २० लाख, गट कर्ज व्याज परतावा योजना मर्यादा रु. ५० लाख, महिला स्वयंशिद्धी व्याज परतावा प्रमुख योजना आहेत. अधिक माहितीसाठी व अर्जासाठी पात्र लाभार्थ्यांनी जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्या., जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे संपर्क साधावा किंवा संपर्क क्रमांक ०७२६२-२४८२८५ तसेच ऑनलाइन अर्जासाठी महामंडळाची www.msobcfdc.org अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

## ओबीसी महामंडळाच्या थकबाकीदारांसाठी एक रकमी परतावा योजना; थकीत व्याजावर ५० टक्के सवलत, ३१ मार्च २०२६ पर्यंत संधी

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., मुंबई तर्फे थकीत कर्जदार लाभार्थ्यांसाठी ''एक रकमी परतावा योजना'' लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत संपूर्ण थकीत कर्जाची रक्कम एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना थकीत व्याज रक्कमेवर तब्बल ५० टक्के सवलत मिळणार आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू राहणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील नागरिकांना महामंडळामार्फत स्वयंरोजगाराकरिता अल्प व्याजदराने कर्ज वितरित जिल्हा कार्यालयाकडून वाटप झालेल्या थकीत लाभार्थ्याना थकीत व्याज रक्कमेवर तब्बल ५० टक्के सवलत देण्यात येणार असून या एकरकमी परतावा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लाभार्थ्यांनी थकीत मुद्दल व व्याज रक्कमेचा भरणा करण्यासाठी महामंडळाचे जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे लाभार्थ्यांनी संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४८२८५ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## संजय सावकारे यांची बुलढाणा जिल्ह्याच्या सहपालकमंत्रीपदी नियुक्ती

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या प्रशासकीय निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्याच्या सहपालकमंत्रीपदी मंत्री संजय सुशीला वामन सावकारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाच्या नव्या आदेशानुसार, भंडारा आणि बुलढाणा जिल्ह्यांचे पालकमंत्री आणि सहपालकमंत्री यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये अंशतः फेरबदल करण्यात आला आहे.

भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून राज्यमंत्री डॉ. पंकज कांचन राजेश भोयर यांची नेमणूक झाली असून, बुलढाणा जिल्ह्याचे सहपालकमंत्री म्हणून मंत्री संजय सावकारे यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

या नियुक्तीनंतर बुलढाणा जिल्ह्यातील रखडलेली विकासकामे मार्गी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शासनाने नुकसानभरपाई जाहीर केली असली तरी ती अद्याप प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. संजय सावकारे यांच्या सक्रिय सहभागामुळे या भरपाईचे वितरण गतीने होईल, अशी अपेक्षा आहे.

जिल्ह्याच्या प्रगतीसाठी ही नियुक्ती अत्यंत सकारात्मक ठरेल, असे स्थानिक पातळीवर मत व्यक्त केले जात आहे. शासनाच्या विविध योजना, विकास प्रकल्प आणि शेतकरी हिताचे निर्णय प्रभावीपणे अंमलात येण्यासाठी संजय सावकारे यांचे सहकार्य महत्त्वाचे ठरेल, असे मानले जात आहे.

# सायामी खेर बनली प्रियदर्शन यांच्या हैवान चित्रपटाचा भाग, अक्षय कुमार आणि सैफ अली खानसोबत कोच्चीमध्ये शूटिंगला सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** अभिनेत्री सायामी खेर आता अधिकृतपणे दिग्दर्शक प्रियदर्शन यांच्या बहुचर्चित हैवान या चित्रपटाचा भाग बनली आहे. या चित्रपटात बॉलिवूडचे दोन दमदार अभिनेते अक्षय कुमार आणि सैफ अली खान एकत्र दिसणार आहेत. सध्या या चित्रपटाचं शूटिंग कोच्चीमध्ये जोमात सुरू आहे आणि यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

सायामीसाठी हा प्रोजेक्ट खूप खास आहे कारण ती पहिल्यांदाच अक्षय कुमार, सैफ अली खान आणि प्रियदर्शन यांच्यासारख्या दिग्गजांसोबत काम करत आहे. याचबरोबर, अक्षय आणि सैफ तब्बल १७ वर्षांनंतर 'तशान'नंतर या चित्रपटात पुन्हा एकत्र स्क्रीनवर दिसणार आहेत.

आपल्या भावना व्यक्त करताना सायामी म्हणाली, ''हैवानच्या सेटवर पहिले पाऊल ठेवणं माझ्यासाठी एक खूप भावनिक आणि सुंदर क्षण होता. अजूनही मला आठवतं, लहानपणी थिएटरमध्ये बसून अक्षय सरचा ॲक्शन अवतार पाहून मी थक्क होत असे, किंवा सैफ सरच्या कॉमिक टाइमिंगवर खळखळून हसत असे. तेव्हा स्वप्नातही वाटलं नव्हतं की एक दिवस त्यांच्यासोबत मी एकाच सेटवर उभी राहीन.''

ती पुढे म्हणाली, ''आज जेव्हा मी शूटिंग दरम्यान आजूबाजूला नजर फिरवते, तेव्हा स्वत:लाच आठवण करून द्यावी लागते की हे खरंच घडतंय. जे चेहरे मी एक काळी पडद्यावर फक्त प्रेक्षक म्हणून पाहायचे, आज त्यांच्यासोबत मी फ्रेम शेअर करतेय. आणि मग प्रियदर्शन सर आहेत ते फक्त एक दिग्दर्शक नाहीत, तर असे कथाकथनकार आहेत ज्यांनी आपल्याला अनेक अविस्मरणीय चित्रपट दिले. त्यांच्या सिनेमांमुळेच मला सिनेमाच्या जगाशी इतकं प्रेम जडलं आणि आज त्यांच्या दिग्दर्शनाखाली काम करणं म्हणजे माझं स्वप्न पूर्ण झाल्यासारखं आहे. अजून शूटिंगची सुरुवातच झाली आहे, पण प्रत्येक क्षण मी अनुभवतेय उत्सुकता, थोडी घाबराट आणि खूप सारा आभारीपणा. माझं मन आनंदाने भरून गेलंय आणि या विशेष चित्रपटाचा भाग होण्याचा मला अभिमान आहे.''






हैवानचे शूटिंग वेगात सुरू असून, इतकी तगडी स्टारकास्ट आणि प्रतिभावान क्रिएटिव्ह टीममुळे हा चित्रपट यंदाच्या सर्वात रोमांचक आणि बहुप्रतिक्षित सिनेमांपैकी एक ठरणार, हे नक्की!

## विविध वृत्त...

## ऐश्वर्या व साक्षीचे राज्य योगा स्पर्धेत यश, राष्ट्रीय पातळीवर झाली निवड





दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी:** नुकत्याच बीड येथे संपन्न झालेल्या ४४ व्या महाराष्ट्र राज्य योगा स्पर्धेत वाशीम जिल्ह्यातील खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत जिल्ह्याचा मान उंचावला.राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये २५ ते ३० या वयोगटात वाशीमची डॉ. साक्षी रवींद्र उदासी हिने रौप्य पदक, तर ऐश्वर्या दिनेश वर्मा हिने कांस्य पदक पटकावत आपले कौशल्य सिद्ध केले.

या दोन्ही खेळाडूंच्या यशाबद्दल वाशीम शहरासह संपूर्ण जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. ऐश्वर्या व साक्षी यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, प्रशिक्षक रणजीत कथडे, तसेच वाशीम जिल्हा योग असोसिएशनचे सचिव रवींद्र सरनाईक यांना दिले आहे. या विजयानंतर या दोन्ही खेळाडुंची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहेत. योग साधना ही केवळ एक स्पर्धा नाही, तर ती एक परिपूर्ण जीवनशैली आहे. शारीरिक लवचिकता, मानसिक शांतता आणि एकाग्रता यांसारख्या अनेक गुणांची ती शिकवण देते. ऐश्वर्या आणि साक्षी यांच्या यशाने हेच अधोरेखित केले आहे. की, नियमित आणि समर्पित योग अभ्यासामुळे कोणतेही ध्येय गाठता येते. त्यांच्या या कामगिरीमुळे वाशीम जिल्ह्यात योग साधनेबद्दल जागरूकता वाढण्यास नक्कीच मदत होईल. नागरिकांनी व विविध संघटनांनी दोन्ही खेळाडुंना पुढील योगा स्पर्धेत केलेल्या कामगिरीमुळे त्यांच्यावर जिल्ह्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

## मुंबई आग्रा महामार्गावर बर्निंग ट्रकचा थरार; गहू घेऊन जाणाऱ्या कंटेनरला भीषण आग



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी:** काल रात्रीच्या सुमारास मुंबई आग्रा महामार्गावर असलेल्या देवभाने फाट्याजवळ शिरपूर कडून धुळ्याच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकला अचानक भीषण आग लागली. ट्रक मध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने ही आग लागल्याचे बोलले जात आहे. वाहन चालकाच्या वेळीच लक्षात येता त्याने गाडीतून उडी घेत आपला जीव वाचवला, यानंतर गहूने भरलेला कंटेनरची संपूर्ण कॅबिन पूर्णपणे जळून खाक झाली. घटनेची माहिती मिळताच धुळे मनपाच्या अग्निशामक दलाच्या माध्यमातून ही आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. दरम्यान, महामार्गावर मोठ्या प्रमाणात ट्राफिक झाली होती. सोनगीर पोलिसांच्या मदतीने ट्रॅफिक सुरळीत करण्यात आली.

## राज्य व जिल्हास्तरीय जागतिक कौशल्य स्पर्धा, २३ वर्षाखालील पात्र उमेदवारांनी ऑनलाइन नोंदणी करावी

**वाशिम/प्रतिनिधी:** जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी जागतिक कौशल्य स्पर्धा दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते. ही स्पर्धा ऑलिंपिक खेळांच्या धर्तीवर होत असून, २०२६ मध्ये ती शांघाई येथे पार पडणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वाशीम जिल्ह्यातील २३ वर्षाखालील पात्र उमेदवारांनी संबंधीत संकेतस्थळावर ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन नावनोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त . प्र. वा. खंडारे यांनी केले आहे.

# मेहकर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा : काँग्रेसचा मुख्यमंत्र्यांकडे आग्रह

### शेतकऱ्यांना तातडीने मदत, सरसकट कर्जमाफी आणि रस्त्यांच्या प्रश्नावर निर्णय घेण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** यावर्षीच्या पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे मेहकर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. त्यामुळे मेहकर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट कर्जमाफी लागू करावी, अशी जोरदार मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली.

यासंदर्भात आज तालुका व शहर काँग्रेसच्या वतीने मेहकर तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या वेळी शेतकऱ्यांचे विविध प्रश्न, रस्त्यांचे दयनीय अवस्थेतील स्वरूप, पांदण रस्त्यांवरील अतिक्रमण यावर देखील ठोस कारवाई करण्याची मागणी करत तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

शेतकऱ्यांचे जगणे अवघड तातडीने घोषणा अपेक्षित

शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक सततच्या पावसामुळे नष्ट झाले आहे. काही भागांमध्ये तर पुन्हा पेरणी करावी लागली, पण त्यालाही पुरेसा पाऊस न झाल्याने दुबार खर्च वाया गेला. या पार्श्वभूमीवर सरकारने त्वरीत हस्तक्षेप करणे अत्यावश्यक आहे, असे मत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी मांडले.

निवेदनात पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या:

ओला दुष्काळ जाहीर करून संपूर्ण तालुक्याला मदतीचा लाभ मिळावा.

सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी लागू करावी.

तत्काळ नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करून आर्थिक मदत दिली जावी.

तालुक्यातील पांदण रस्त्यांवरील अतिक्रमण हटवून पक्के रस्ते तयार करण्यात यावे.

पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवावी आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी तात्काळ करावी.

मोठ्या प्रमाणावर काँग्रेस कार्यकर्त्यांची उपस्थिती

या निवेदनप्रसंगी तालुक्यातील काँग्रेसचे सर्वच पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये शामभाऊ उमाळकर, कासम भाई गवळी, अनंतराव वानखेडे, दिगंबरराव मवाळ, चित्रांगण खंडारे, वसंतराव देशमुख, डॉ. शेषराव बदर, डॉ. भरत आल्हाट, शैलेश बावस्कर, विनायकराव टाळे, गजानन सरकटे, युनूस पटेल, विलासराव चनखोरे, प्रकाश आषीश, अफरोज पठाण, मिलिंद खंडारे,



गणेश मोसंबे, निसार कुरेशी, राजू देशमुख, सुभाष आडे, अमोल मस्के, नामदेवराव गवळी, किशोर मरकड, मनोज वानखेडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश होता.

तालुका काँग्रेस अध्यक्षांचा पुढाकार

कार्यक्रमाचे आयोजन तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. प्रदीप देशमुख यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. त्यांनी या आंदोलनात सहभागी सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, ''सरकारने शेतकऱ्यांचे दुःख ओळखून तातडीने निर्णय घेतला नाही, तर काँग्रेस रस्त्यावर उतरून संघर्ष उभारेल

## डोणगावमध्ये गणेश मूर्ती विक्रीला मंद प्रतिसाद अतिवृष्टीमुळे व्यापाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी:** गणेश चतुर्थीचे औचित्य साधत २७ ऑगस्ट रोजी गणपती बाप्पा घराघरात विराजमान होत आहेत. मात्र, यंदा डोणगावसह परिसरातील मूर्ती विक्रीवर अतिवृष्टीचा मोठा परिणाम झाला आहे. मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, या आर्थिक फटक्याचा परिणाम संपूर्ण बाजारपेठेवर जाणवू लागला आहे. त्याचा थेट परिणाम गणेश मूर्तींच्या विक्रीवरही झाला आहे.



श्रींच्या स्थापनेस्थानी परंपरेनुसार दरवर्षी ग्राहक मोठ्या संख्येने मूर्ती खरेदीसाठी गर्दी करत असतात. मात्र, यंदा अपेक्षेप्रमाणे विक्री न झाल्याने मूर्ती विक्रेत्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. ''सण उत्सव जवळ आला असतानाही ग्राहक मूर्ती घेत नाहीत. विचारपूस होतेय, पण खरेदी कमी आहे. इतक्या मेहनतीनं बनवलेल्या मूर्ती विकल्या जात नाहीत हे पाहून हतबल वाटतंय,'' असं एका मूर्तिकाराने सांगितलं.

अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी पिकांचे नुकसान झालं आहे, घरांची पडझड झाली आहे आणि त्यामुळे आर्थिक स्थिती डगमगली आहे. या पार्श्वभूमीवर लोकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतल्याचेही बोललं जात आहे. डोणगावमध्ये तयार झालेल्या अनेक आकर्षक व नवनवीन मूर्ती सध्या विक्रीसाठी शिल्लक आहेत. सणाचा उत्साह असला तरी खरेदीचा उत्साह मात्र फिका असल्याचं चित्र आहे. याबाबत शासनाने या आर्थिक नुकसानीची दखल घेऊन मूर्ती विक्रेत्यांसाठी काही ठोस उपाययोजना कराव्यात.अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे.

## जन्मा जागरण कार्यक्रमाला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी::** स्थानिक श्री रामदेव बाबा मंदिर संस्थान यांच्यावतीने २४ ऑगस्ट रोजी श्री रामदेव बाबा यांचा जन्मा जागरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गायक पंडित उमेश शर्मा उर्फ डब्बुजी व कुमारी नेतल शर्मा यांच्या अमृतवाणीतून आयोजित या कार्यक्रमाला महिला भाविकांचा भव्य प्रतिसाद लाभला.

स्थानिक महेश भवन येथे आयोजित श्री रामदेव बाबा जन्मा जागरण कार्यक्रमाला पंडित उमेश शर्मा व कुमारी नेतल शर्मा यांचे स्वागत समाजसेवी मुलचंद करवा श्यामसुंदर करवा, नितीन करवा, सचिन करवा व करवा परिवाराच्यावतीने करण्यात आले. सदर जन्मा जागरण कार्यक्रमाला भागवत कथा वाचक नामदेवराव काकडे महाराज, पंडित नीरज उर्फ लाला शर्मा, आमदार श्याम खोडे समवेत जिल्ह्यातील समाज बांधव, प्रतिष्ठित नागरिक गण व भक्त प्रेमी उपस्थित होते. यावेळी श्री रामदेव बाबा यांचे विविध परचे गीत गायन भक्ती गीते सादर करण्यात आली.

सोबतच तीन बाण के धारी तीनो बान चलाओ ना, भगवान भोलेनाथ यांची भक्ती गीते ही सादर करण्यात आली, खम्मा खम्मा समवेत अनेक गीतावर भक्तांनी नृत्याचा आनंद घेतला. सोबतच संतांनी यामध्ये सहभाग नोंदवित भक्तांना प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रम स्थळी श्री रामदेव बाबा ज्योत चे सर्वांनी दर्शन व आहुती देऊन लाभ घेतला. श्री रामदेव बाबा जन्मोत्सव झाकी सादर करण्यात आली. गायक शर्मा यांना त्यांच्या समूहांनी उत्तम साथ दिली. कार्यक्रमानंतर भक्तांकरिता महाप्रसादाची व्यवस्था करवा परिवारांच्या वतीने करण्यात आली होती. हजारो भक्तांनी महाप्रसादाचाही लाभ घेतला. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करवा परिवाराच्या पुढाकाराने पार पडले. करवा परिवारातील सदस्यांनी व नातेवाईकांनीही विविध भक्ती गीतावर ताल नृत्याचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालन नितीन करवा तर आभार सचिन करवा यांनी मानले.

## पांगरी महादेव येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिर



दैनिक आपला विदर्भ

**मंगरुळपीर/प्रतिनिधी:** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र वनोजा अंतर्गत ग्राम पांगरी महादेव येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकूण १६४ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणीत १४ नवीन बी.पी. रुग्ण व २ डायबेटीज रुग्ण आढळून आले. तसेच ७२ नागरिकांच्या रक्त तपासण्या घेण्यात आल्या असून त्यामध्ये विविध चाचण्यांचा समावेश होता. यावेळी गावात साथरोग सर्वेक्षण व कंटेनर सर्वेक्षण करून डास अळी आढळून आलेले कंटेनर तत्काळ रिकामे करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांविषयी जागरूकता निर्माण झाली. शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र वनोजाचे संपूर्ण आरोग्य पथक उपस्थित होते.

# आयुष्मान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घ्यावा

### जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी:** आरोग्य सेवा ही सामान्य जनतेच्या जीवनाशी थेट निगडीत बाब आहे. त्यामुळे यात कोणतीही दिरंगाई न करता जबाबदारीने कार्य करणे आवश्यक आहे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी आरोग्य यंत्रणेला दिले. केंद्र शासनाची महत्वाकांक्षी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ही सामान्य जनतेसाठी आरोग्य विमा कवच ठरत आहे.जिल्ह्यात या योजनांची अंमलबजावणी १ एप्रिल २०२० आणि २८ जुलै २०२३ पासून सर्व शिधापत्रिका धारक कुटुंबांसाठी करण्यात आली असून आतापर्यंत तब्बल ११ लाख ५३ हजार ९५७ लाभार्थी पात्र झाले आहेत.या योजनांमुळे सर्वसामान्य जनतेला महागड्या उपचारांचा आर्थिक भार न पडता मोफत आरोग्यसेवा उपलब्ध झाली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

### जिल्ह्यातील शासकीय व खासगी रुग्णालयांचा समावेश

जिल्ह्यातील ९ शासकीय व २० खाजगी रुग्णालये अंगीकृत असून यात जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये तसेच वाशीम शहरातील बालाजी बाल रुग्णालय, बिबेकर हॉस्पिटल, प्रताप हॉस्पिटल, जिजाऊ ऑर्थोके अर, वोरा हॉस्पिटल, विजय हृदयालय, साई हॉस्पिटल आदी नामांकित खाजगी रुग्णालयांचा समावेश आहे.

### ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार

या योजनेंतर्गत १,३५६ गंभीर आजारांवर ५ लाख रुपयांपर्यंत उपचार आणि शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येतात. हे आरोग्य विमा कवच प्रति कुटुंब, प्रति वर्ष या पद्धतीने उपलब्ध आहे.

### लाखो नागरिकांना प्रत्यक्ष लाभ

आतापर्यंत १४ हजार १४५ लाभार्थ्यांनी शस्त्रक्रिया व उपचाराचा लाभ घेतल.यावर शासनाकडून ६४ कोटी ५९ लाख ९६ हजार ७७० रुपये खर्च मंजूर करण्यात आले असून जिल्ह्यात ५ लाख १६ हजार ७७७ लाभार्थ्यांना आयुष्मान कार्डचे वितरण करण्यात आले आहे.

